# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/11/2022 (सोमवार) दुपार

---

## दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर –** अंतर्गत मौजा एमआयडीसी शिवाजी नगर, ता. कळमेश्वर येथे दिनांक १३/११/२०२२ चे ०९.०० वा. दरम्यान सुमारास फिर्यादी नामे– सौ. रामेश्वरी लिलाधर ठाकरे, वय ४५ वर्ष, रा. एमआयडीसी शिवाजी नगर ही आपल्या घरी हजर असता आरोपीचा पति आरोपी नामे– लीलाधर ठाकरे हा तिला विनाकारण दारू पिवुन शिवीगाळ करीत होता. तिथे तु कशाला शिव्या देत आहे. आरोपी याने म्हंटले ''मला तु पैसे दे कामाला जाते'' तर फिर्यादीने ''पैसे देत नाही'' असे म्हटले असता आरोपीने चुलीतील लाकडी काडी फिर्यादीच्या डोंक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भा.द.वि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कळमेश्वर करीत आहे.

**पो.स्टे. बेला –** अंतर्गत ३६ किमी पुर्व मौजा झमकोली शिवार येथे दिनांक १४/११/२०२२ चे ०८.३० वा. ते ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. मनिषा स्वप्नील डांगे, वय ३२ वर्ष, रा. जाम, ता. समूद्रपूर हीला आरोपी क्र. १) ग.भा. कांताबाई मधूकर जांभूळे, वय ५० वर्ष याने उधारीचे ८०००/– रू. मागितले असता फीर्यादी हीने म्हटले की, ''माझ्या कडून मूलीच्या तब्येती करीता खर्च झाले असून पगार होताच परत देतो'' असे म्हटले असता आरोपी क्र १ हीने म्हटले की ''पैसे आत्ताच पाहीजे'' असे म्हणून शिवीगाळ करून हात बूक्क्यांनी मारहाण करून मांडीला चावून जखमी केले. तेव्हा फीर्यादीचे पति व आई मध्यस्ती करण्या करीता आले असता आरोपी क्र २) मयूर मधूकर जाभूंळे, वय २६ वर्ष, दोन्ही रा. झमकोली टेकडी ता. भिवापूर याने ढकल ढूकल करून फीर्यादीचे पतिची गच्ची पकडून मान दाबली व झगडा भांडण करून शिवीगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दीली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन बेला येथे आरोपींविरुध्द कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भा.द.वि. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन बेला करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**